*Annexure XVII (3), (Vide Article - 17.02)*

प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय

---

<u>परिपत्रक</u>

क्रमांक:कक्ष-१६/विक्री/ए-२/८८९/९४-९५
नागपूर -४४० ००१, दिनांक : २९ सप्टेंबर ९४

विषय:-दोनवार वर ठेवलेल्या लिलावाच्या मंजुरीचे दिनांकाबाबत.

संदर्भ :-या कार्यालयाचे परिपत्रक क्र.कक्ष-१६/विक्री/ए-२/१०१३
दिनांक २५.२.१९९१.

...

दोन वारवर ठेवलेल्या लिलावाचे मंजुरीस काही प्रकरणी उशीर झाल्याने अडचणी निर्माण झाल्याचे आढळून आले आहे. या संदर्भात परिपत्रक क्र.कक्ष-१६/विक्री/ए-२/१०१३, दिनांक २५.२.९१ अन्वये लिलाव मंजुरीचा दिनांक व व्याजाची आकारणीबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. जे लिलाव दोन वारवर राखून ठेवलेले असतील अशा लिलाव मंजुरीच्या दिनांकाबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

[१] लिलाव करणारे उपवनसंरक्षक यांनी दोनवार वर ठेवलेल्या लिलाव प्रकरणे, आवश्यक माहिती व शिफारशीसह सक्षम अधिकाऱ्याकडे मंजुरीकरिता लिलावाच्या शेवटच्या दिवसानंतर पांच दिवसाचे आंत सादर करावीत.

[२] सक्षम अधिकारी यांनी प्रकरणे प्राप्त झाल्यावर पांच दिवसाचे आंत दोन वारवर ठेवलेल्या लिलावा बद्दल निर्णय घेऊन संबंधित उपवनसंरक्षक यांना परत करावीत.

[३] उपवनसंरक्षक यांनी सक्षम अधिकारी यांचेकडून दोनवार वर ठेवलेल्या लिलावा संबंधी निर्णय दिल्याचे तारखेपासून तीन दिवसाचे आंत लिलाव जाहीर करून सूचना फलकावर लावावेत.

[४] उपवनसंरक्षक यांनी लिलाव जाहीर केल्याचा दिनांक ही लिलाव मंजुरीची तारीख समजण्यात यावी.

२.० वर सूचित केलेली कालमर्यादा ही अधिकतम मर्यादा आहे. सर्व संबंधितांनी ह्याबाबतीत दक्षता ठेवून लिलाव प्रकरणे लवकरांत लवकर निकाली काढावीत.

३.० एकीकृत आगार विक्री शर्तीनुसार लिलाव अथवा विक्री करतांना १/४ रक्कम किंवा ३/४ रक्कम भरण्यासाठीच्या मुदतीमधील शेवटचा दिवस जर सरकारी बँकांचा सुट्टीचा दिवस असेल अथवा राज्य शासनाची कार्यालये बंद असतील तर सदर शेवटच्या दिवसानंतर लगतचा बँक/कार्यालय सुरू असेल तो १ दिवस, हा संबंधित मुदतीतील अखेरचा दिवस समजण्यात यावा.

मुख्य वनसंरक्षक [उत्पादन]
महाराष्ट्र राज्य, नागपूर.

प्रति,
वनसंरक्षक [सर्व]
उपवनसंरक्षक [सर्व].
प्रतिलिपी:-प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य नागपूर यांस माहितीस्तव सादर.
प्रतिलिपी:-मुख्य वनसंरक्षक [सर्व] यांना माहिती व आवश्यक कारवाईस्तव सस्नेह अग्रेषित.